**दिनांक 06.10.2021**

बौध्द अध्यासन आणि संशोधन केंद्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव द्वारा **बौध्द तत्वज्ञान आणि भारतीय उच्च शिक्षणप्रणाली (Buddhist Philosophy and Indian Higher Education System)** या विषयावर ग्रंथ प्रकाशित करण्यात येणार असून त्याकरिता प्राध्यापक ,शिक्षक, अभ्यासक, तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी यांच्याकडून **शोधनिबंध वा लेख** मागविण्यात येत आहेत. सदर शोधनिबंध / लेख ISBN प्राप्त पुस्तकात प्रकाशित करण्यात येणार आहेत. शोधनिबंध / लेख प्रकाशित करण्यासाठी कुठलेही प्रक्रिया शुल्क आकारले जाणार नाही मात्र पुस्तकाच्या दोनप्रती प्रकाशनानंतर वैयक्तिक खरेदी कराव्या लागतील. तरी त्यासंदर्भातील सविस्तर **नियमावली वा माहितीपत्रक** सोबत जोडले आहे. या संदर्भात अधिक माहिती हवी असल्यास डॉ. संतोष खिराडे, प्र. विभागप्रमुख, बौध्द अध्यासन आणि संशोधन केंद्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, मोबाईल न. 9960772604, ई.मेल buddhiststudycentre@gmail.com यांच्याशी संपर्क साधावा, तरी आपले अभ्यासपूर्ण लेख पाठवावे ही नम्र विनंती.

**प्रा. डॉ. अनिल डोंगरे**
प्र. संचालक,
विचारधारा प्रशाळा,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
फोन : 0257-2257261/63



# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## बौध्द अध्यासन आणि संशोधन केंद्र

प्रिय शिक्षक/संशोधक मित्रहो,

बौध्द तत्वज्ञानाचा आधुनिक काळात उपयुक्त जीवनविषयक मूल्ये आणि संस्कृतीचे संवर्धनातून मानवी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी बौध्द अध्यासन आणि संशोधन केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविले जातात.जागतिक समस्या सोडविण्यासाठी तथागत गौतम बुध्दांची वैश्विक शिकवण आजच्या काळातही उपयुक्त आहे. आधुनिक शिक्षणास तत्त्वज्ञानाचे प्रारंभिक अधिष्ठान लाभले आहे. बौध्द शिक्षणाचे मुख्य ध्येय मनुष्यमात्रांचा सर्वांगीण विकास हा असून यात त्यांच्या शारीरिक, मानसिक, नैतिक आणि बौध्दिक विकासाचा समावेश आहे. बौध्द शिक्षणाचे ध्येय एक मुक्त माणूस, एक शहाणा, बुध्दिमान, नैतिक, तर्कनिष्ठ, अहिंसक आणि धर्मनिरपेक्ष माणूस बनविणे आहे. आधुनिक उच्च शिक्षण प्रणालीस बौध्द तत्त्वज्ञानाच्या अधिष्ठानावर आधारित अध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि तज्ज्ञांचे अभ्यासपूर्ण लेख ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याच्या हेतूने प्राध्यापक,शिक्षक, अभ्यासक, तज्ज्ञ, संशोधक विद्यार्थी यांच्याकडून शोधनिबंध/लेख मागविण्यात येत आहेत. सदर शोधनिबंध वा लेख ISBN प्राप्त पुस्तकात प्रकाशित करण्यात येणारआहेत.

❋ मुख्य विषय ❋

## बौध्द तत्त्वज्ञान आणि भारतीय उच्च शिक्षणप्रणाली

( Buddhist Philosophy and Indian Higher Education System )

### संशोधन लेख पाठविण्यासाठीचे उपविषय

- ❋ बौध्द तत्त्वज्ञान आणि उच्च शिक्षण
- ❋ बौध्दांच्या शिकवणूकीतील मूल्यांचे आधुनिक शिक्षणात उपयोजन
- ❋ बौध्द तत्वज्ञानानूसार आधुनिक शिक्षणाची ध्येये
- ❋ अष्टांगमार्गाचे आधुनिक शिक्षणात उपयोजन
- ❋ बौध्दसाहित्य आणि शिक्षण
- ❋ जातक कथा आणि आधुनिक शिक्षणाची मूल्ये
- ❋ भगवान बुध्द : एक आदर्श शिक्षक
- ❋ बुध्दाच्या विचारांची साम्यता आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील तरतूदी
- ❋ बौध्द शिक्षणप्रणाली आणि आधुनिक काळ
- ❋ बौध्दकालीन विद्यापीठातील शिक्षणप्रणाली
- ❋ बौध्द कालीन कला आणि शिक्षण
- ❋ पाली भाषा शिक्षणाचे महत्व
- ❋ तथागत गौतम बौध्द आणि मानवतावादी मूल्यशिक्षण
- ❋ तथागत गौतम बौध्दांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे उच्च शिक्षणातील महत्व
- ❋ तथागत गौतम बौध्दांना अपेक्षित विपश्यना साधनेचे शिक्षण प्रक्रियेतील उपयोजन

❋ बौध्द तत्त्वज्ञान आणि भारतीय उच्च शिक्षणप्रणाली संबंधित अन्य कोणताही विषय

### ❋ शोधनिबंध लेख पाठविण्यासाठी महत्वाच्या सूचना :–

1) शोधनिबंध/लेख पूर्णपणे स्व:लिखित व इतरत्र कुठेही प्रकाशित झालेले किंवा प्रकाशनास दिलेले नसावे.
2) शोधनिबंध/लेख हे मराठी वा इंग्रजी भाषेत जवळपास 1500 ते 2000 शब्दात लिहावेत.
3) शोधनिबंध टंकलेखनाकरिता Times New Roman/Unicode/ISM किंवा APS चा वापर करावा तसेच लेखाची Word File व Pdf File दोन्ही फाईल पाठवाव्यात.
4) शोधनिबंध/ लेखाच्या शेवटी योग्य संदर्भ मांडणी करावी.
5) लेख स्विकारणे वा नाकारणे यांचे संपूर्ण अधिकार संपादक मंडळास असतील.
6) शोधनिबंध/ लेख प्रकाशित करण्यासाठी कुठलेही प्रक्रिया शुल्क आकारले जाणार नाही मात्र पुस्तकाच्या दोन प्रती प्रकाशनानंतर वैयक्तिक खरेदी कराव्या लागतील.
7) शोधनिबंध/लेखातील मजकूरास लेखक स्वत: जबाबदार राहील.(प्रकाशक/संपादक जबाबदार राहणार नाही.)
8) शोधनिबंध लेखात आपले नांव, पदनाम, महाविद्यालयाचे नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक व ई–मेल इत्यादी माहिती द्यावी.
9) सदर ग्रंथासंदर्भात आपल्या काही सकारात्मक सूचना असल्यास ई–मेल वर पाठवाव्यात.
10) लेखनकार्यास संपादक मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर लेखकांस संमतीपत्र/ हमीपत्र/कॉपीराईट फॉर्म भरुन सादर करणे आवश्यक राहील.

शोधनिबंध /लेख buddhiststudycentre@gmail.com या ई–मेल पत्त्यावर पाठवावे.
शोधनिबंध पाठविण्याची अंतिम मुदत 15 नोव्हेंबर 2021 ही राहील.
शोधनिबंध/लेख हे ISBN प्राप्त पुस्तक किंवा ई पुस्तकाच्या स्वरुपात प्रकाशित करण्यात येईल.

### ❋ अधिक माहितीसाठी संपर्क ❋

**डॉ. संतोष खिराडे**
प्र. विभागप्रमुख
बौध्द अध्यासन आणि संशोधन केंद्र,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
मोबाईल नं.9960772604
email : buddhiststudycentre@gmail.com

**प्रा.डॉ. अनिल डोंगरे**
प्र. संचालक
विचारधारा प्रशाळा
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
फोन : 0257 – 2257261/63